## वर्ष : १९८८

# कविता पानोपानी

प्रथितयश मराठी गीतकार म्हणून प्रसिद्ध असलेल्या सुधीर मोघे या कलंदर कलावंताने नुकताच एक कविता विषयक अभिनव कार्यक्रम रंगभूमीवर आणला. 'कविता विषयक' असं म्हटलं कारण कार्यक्रमाचा केंद्रबिंदू 'कविता' असला तरी इतरही बऱ्याच गोष्टी यात आहेत. संपूर्णपणे एकट्याच्या बळावर नाविन्यपूर्ण कार्यक्रम तोही कवितांचा करण्याचे नवे धाडस सुधीर मोघे यांनी दाखवलं आहे.

वास्तविक कवीमुखातून कविता ऐकणं हे मराठी रसिकाला नवे नाही. आत्तापर्यंत अनेक मातब्बर मराठी कवीमंडळींनी आपापल्या कविता मराठी माणसासमोर समर्थपणे सादर केलेल्या आहेत. तरीही सुधीर मोघे यांचा 'कविता पानोपानी' हा कार्यक्रम अनुभवल्यानंतर हमखास वेगळेपण जाणवतं. हे वेगळेपण जाणवण्याचे प्रमुख कारण मोघे यांनी 'कविता सादरीकरण' या प्रकाराला दिलेला नवा आशय! अर्थात हा नवा आशय भरण्यासाठी ज्या एका विलक्षण मिश्रण असलेल्या व्यक्तीमत्वाची गरज असते, ते अगदी नेमकेपणानं सुधीर मोघे यांच्याकडे आहे. एक संवेदनशील कवी, संगीताची जाण असलेला एक गानलुब्ध, समोरच्या समूहाला जागीच खिळवून ठेवण्याची क्षमता असलेला रंगमंचावरील एक समर्थ अभिनेता या तिन्ही गोष्टी एकत्रीतपणे आल्यावर जाणत्या रसिकाला किती दर्जाचा कलाविष्कार दाखवू शकतात, याचं उत्तम उदाहरण 'कविता पानोपानी'.

पडदा वर जातो, तेव्हा रंगमंच पूर्णपणे अंधारात बुडालेला! अचानक धीरगंभीर स्वरात आणि अनोख्या चालीत गणेशवंदना सुरू होते. हळूहळू रंगमंच उजळन जातो आणि नंतर अंगावर कोसळतो शब्द, धनी आणि प्रकाशमाध्यमांच्या संगमात एकरस झालेला एक विलक्षण अनुभव! एकामागून एक कवितांच्या सरी कोसळू लागतात. कथा संगीतासह चक्क तसच्या तसं गाणं तर कधी नुसता मुक्तछंद! या दोन्ही टोकांच्या मधले कविता सादर करण्याचे अनेक पर्याय

समर्थपणे हाताळले जातात. कवितेला भडक होऊ न देता कवितेचा दृश्यात्मक परिणाम साधणारी संयमी प्रकाशयोजना या कार्यक्रमाचं वैशिष्ट्य ठरावी. याचबरोबर संगीताची साथ म्हणून कुठेही प्रत्यक्ष वाद्याचा उपयोग न करता टेपरेकॉर्डचा वापर, या प्रयोगामागची अविश्रांत मेहनत जाणवून देते. दीड तासाच्या आत आटोपशीर कार्यक्रमाला मध्यंतर नसले तरी केवळ कवितांच्या बळावर एकट्या माणसाने शेकडो लोकांच्या जमावाला दीड तास खिळवून ठेवायचे ही गोष्ट सामान्य खचितच नाही.

**एक स्वगत**

कार्यक्रमाआधीच्या अगदी छोट्याशा निवेदनात सांगितले जाते, त्याप्रमाणे हा कार्यक्रम एक स्वगतही आहे आणि त्याचबरोबर संवादही! कार्यक्रम अनुभवल्यानंतर लक्षात येते की, हा नुसता शब्दसंवाद नव्हता तर नादसंवाद आणि त्याचबरोबर रूपसंवादही होता. कवितेला दृश्यात्मक परिणाम देण्याची सुधीर मोघेची नवी कल्पना पचनी पडायला जड असली तरी हा प्रयोग त्यांनी ज्या कलात्मकतेने हाताळला आहे. तो निश्चितच कौतुकास्पद आहे. कवीचं स्वतः कवी असणं, संगीताचा बाज आणि अविष्करणाची नेमकी पद्धत यामुळे कार्यक्रम जाणत्या रसिकांच्या थेट मनाला भिडतो.

अनेक वैविध्यपूर्ण (विषयांच्या नव्हे, तर रचनेच्यासुद्धा) कवितांमधून सुधीर मोघेची कधी सौंदर्यपूर्ण, कधी रसिक, कधी नादलुब्ध तर कधी त्रयस्थ, कठोर तत्त्वचिंतक अशी अनेक रूपं दिसतात. तरीही त्यातून सुधीर मोघेची एकसंध पण कलंदर प्रतिमा रसिकांच्या मनात उभी राहते, याला जोड मिळते. कवितांच्या विशिष्ट क्रमामुळे मनावर झालेल्या अबोध परिणामाची! त्यामुळे कार्यक्रम संपल्यावर एका संवेदनशील बहुरंगी कलावंतांशी संवाद साधल्याचं समाधान श्रोत्याला मिळतं. प्रत्येक कवीतेच्या आत-आत कुठेतरी असलेली एक विशिष्ट लय श्रोत्याच्या रसिकतेला आवाहन करत, कवीच्या भावकल्लोळाशी एकरूप होते आणि म्हणूनच तिथे जन्म घेतो एक आनंदानुभव!

या कार्यक्रमातील सर्वच्या सर्व कविता स्वतः मोघे यांच्या आहेत. कार्यक्रमाची संकल्पना आणि आविष्कारण स्वतः सुधीर मोघेंचेच असल्याने कवितांच्या निवडीमागील चोखंदळपणाचे श्रेयही त्यांनाच द्यायला हवे. कोणत्याही जातिवंत कवीप्रमाणे त्याच्या या कविता आयुष्याच्या जात्यापर्यंत झालेल्या निरंकुश वाटचालीतल्या वळणावरच्या खुणाच आहेत. प्रत्येक वळणाचा 'मुड' निराळा तसाच 'सीनही' निराळा! अनेक प्रकारच्या कविता असल्या तरी त्यामागचे प्रामाणिक कलावंत मन एकच आहे. त्यामुळे या संपूर्ण कार्यक्रमात ‘सातत्य’ जाणवते.

कार्यक्रम संपल्यावर रसिक बाहेर पडतो, तेव्हा त्याच्या ओठी शब्द असतात. 'सखी मंद झाल्या तारका' कारण आकाशवाणीवर असंख्य वेळा ऐकलेलं हे भावगीत प्रत्यक्ष कवीच्या तोंडून ऐकताना आगळाच प्रत्यय देतं. म्हणूनच हा कार्यक्रम नुसता ऐकण्याचा नाही किंवा नुसता पाहण्याचाही नाही. तो आहे अनुभवण्याचा कार्यक्रम! दैनंदिन जीवनक्रमाच्या चरकात पुन्हा पिळून घेण्यासाठी माणसे हा कार्यक्रम झाल्यावर घरी जातात, तेच अतृप्त समाधानाचं दुःख सुख घेऊन!.